N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0667 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/07/2025 05:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 23/07/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/07/2025
**Time From (वेळेपासून):** 13:18 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/07/2025 **Time (वेळ):** 04:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/07/2025 04:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा पुरवठा अधिकारी ,कार्यालय बुलडाणा,व मुठठे ले आऊट बुलडाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.समाधान लक्ष्मण ताठे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो जांब,ता जि बुलढाणा ,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो जांब,ता जि बुलढाणा ,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8888319665

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री.गजानन नंदकिशोर टेकाळे | | | 1. सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,बुलढाणा,बुलढाणा,, बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |
| 2 | खाजगी ईसम श्री. देवानंद बळीराम खंडाळे | | | 1. सेवानिवत्त जिल्हा लेखा , पर्यवेक्षक,तानाजी नगर,बुलढाणा, बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अप नंबर 667/2025 कलम 7, 7A,12 भ्रष्टाचार प्रतीबंधक अधीनीयम
फिर्यादी - दिनांक 24.07.2025
श्री.समाधान लक्ष्मण ताठे, वय 49 वर्ष, व्यवसाय शेती, रा. मु.पो.जांब ता.जि.बुलढाणा
मो.नं. 8888319665
आरोपी- 1.लोकसेवक श्री.गजानन नंदकिशोर टेकाळे,वय 40 वर्ष पद- सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,बुलढाणा, पदभार जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा रा खडकपुरा वार्ड नबर 21 चिखली ता चिखली जि बुलडाणा 2. खाजगी ईसम श्री.देवानंद बळीराम खंडाळे, वय 62 वर्ष, सेवानिवृत्त जिल्हा लेखा पर्यवेक्षक रा.तानाजी नगर, बुलढाणा ता.जि.बुलढाणा
घटनास्थळ- जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय बुलडाणा व मुठठे ले आऊट बुलडाणा
घतावेळ – दिनांक 23/07/2025 चे 13.18 ते 13.50
दाखल अधीकारी- पोहेका सुभाष म्हस्के बन 904 पो स्टे बुलडाणा शहर
तपास अधीकारी- भागोजी चोरमले पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा मो नं 9552520188
मिळाला माल-
लाप्रवि. बुलढाणा
दिनांक 24.07.2025
श्री.समाधान लक्ष्मण ताठे, वय 49 वर्ष, व्यवसाय शेती, रा. मु.पो.जांब ता.जि.बुलढाणा
मो.नं. 8888319665 मी वरीलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो. शेतीचा व्यवसाय करतो. मी दिनांक 21.07.2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा घटकाकडे जिल्हा पुरवठा अधिकारी बुलढाणा श्री. टेकाळे हे मी शासनाच्या हमी भाव केंद्रावर विक्री केलेल्या ज्वारीचे बिल निघण्यास कोणतीही अडचण न येवू देण्यासाठी व भविष्यात ज्वारी विक्रीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी तसेच माझेवर कोणतीही कार्यवाही न करण्यासाठी, मी 700 ते 800 क्विंटल ज्वारी विक्री केलेली नसतांना 700 ते 800 क्विंटलचे 100 रुपये प्रती क्विंटलप्रमाणे लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस उपअधिक्षक श्री.चोरमले साहेब यांनी पुढील कार्यवाहीकरीता दिनांक 21.07.2025 रोजी दोन शासकिय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करुन घेवून माझे तक्रारीची खात्री झाल्यानंतर पंचाना व मला पडताळणी पंचनाम्याबाबत सविस्तर सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डरबाबत माहिती दिली. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानुसार दिनांक 21.07.2025 रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याकरीता पोउपअधि श्री.चोरमले साहेब यांनी माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून पोकॉ व्यवहारे यांच्या करवी गळयात शर्टाचे आतील बाजुस लटकावुन देवुन मला व पंच क्र. 1 श्री.खेडकर यांना जिल्हा पुरवठा अधिकारी, कार्यालय बुलढाणा येथे 15.51 वा. रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 श्री. खेडकर असे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय येथे जावुन जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांची भेट घेतली असता त्यांनी पंच क्र.1 श्री.खेडकर यांचे बाबत विचारणा करून आम्हाला कॅबीनच्या बाहेर जाण्यास सांगीतले.

त्यानंतर मी खाजगी इसम श्री.खंडाळे यांचेसोबत जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांची भेट घेतली. तेव्हा लोकसेवक श्री.टेकाळे यांचेशी कामाची चर्चा केली असता त्यांनी ज्वारी विक्रीचे प्रति क्विंटल 100/- रुपये प्रमाणे 70,000/- रूपये लाचेची मागणी केली. तेव्हा खाजगी इसम श्री.देवानंद खंडाळे यांनी सुध्दा मला 70,000/- रूपये लाचेची मागणी करून पटकन देवुन टाका असे म्हणून लाचेची रक्कम स्विकारण्यास समंती दर्शविली. जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांनी मागणी केलेली लाच रक्कम जास्त होत असल्याने मी त्यांना लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी मला किती पैसे कमी करणार याबाबत सांगीतले नसल्याने मी लाप्रवि कार्यालयात परत आलो. त्यावेळी आमच्या मध्ये झालेले संभाषण श्री.चोरमले साहेब व सापळा पथकाने ऐकून लोकसेवक टेकाळे व खाजगी ईसम खंडाळे यांची वरीलप्रमाणे लाच मागणी असल्याची खात्री केली व माझे विनंतीप्रमाणे सदर प्रकरणात पुन्हा दिनांक 22.07.2025 रोजी पडताळणी कार्यवाही केली असता तडजोडअंती जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे व खाजगी इसम श्री.देवानंद खंडाळे यांनी 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी अर्धी रक्कम 25000/- रुपये आणुन देण्यास सांगीतले.

त्यावरुन दिनांक 23.07.2025 रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे व खाजगी ईसम श्री.देवानंद खंडाळे यांचेवर सापळा कारवाई करणे असल्याने मी, ला.प्र.वि.कार्यालय, बुलढाणा येथे हजर असतांना पोलीस उपअधिक्षक श्री.चोरमले यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांना लाचेचा पहिला हप्ता म्हणून देण्यासाठी मला 25,000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता, मी माझेजवळील भारतीय चलनातील 500/- रुपये दराच्या 20 नोटा असे 10,000/- रूपये हजर केले तसेच उर्वरीत रक्कमेची व्यवस्था आपणच करावी असे सांगीतले. त्यावरुन पोउपअधि श्री.चोरमले साहेब यांनी 500/- रुपयांसारख्या दिसणा-या खेळण्यातील भारतीय बच्चो का बँक असे लिहीलेल्या 30 नोटा अशा ह00/- रूपये किंमतीच्या नोटा उपलब्ध करुन घेतल्या. त्यावेळी श्री.चोरमले साहेब यांनी सापळा पथकातील सदस्याचे मदतीने चलनी नोटांचे क्रमांक व वर्णन नोंद करुन घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. त्यानंतर अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम माझे पॅटच्या उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवून देवून मला व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवुन त्याबाबत सविस्तर सापळा पुर्व पंचनामा तयार करुन लोकसेवक श्री.टेकाळे व खाजगी इसम श्री.खंडाळे हे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय येथे असल्याने सदर ठिकाणी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार पोलीस उपअधिक्षक श्री.चोरमले साहेब यांनी माझ्याकडे व्हाॅईस रेकाॅर्डर सुरु करुन पोकॉ व्यवहारे यांचे करवी माझे गळ्यात लटकावून देवून मला व पंच क्र 1 श्री. खेडकर यांना माझे मोटार सायकलने जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडे रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग पोलीस उपअधिक्षक श्री.चोरमले साहेब, पोलीस निरीक्षक श्री.पवार, पंच क्र.2 श्री.बाहेकर तसेच सापळा पथक असे खाजगी वाहनाने व सापळा पथकातील काही सदस्य मोटार सायकलने जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडे रवाना झाले. त्यावेळी मी व पंच तसेच सापळा पथक असे कार्यालयाच्या परिसरामध्ये पोहचलो, त्यावेळी पोउपअधि श्री.चोरमले साहेब, पोलीस निरीक्षक श्री.पवार व सापळा पथक व पंच क्र 2 असे जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या आजुबाजुला पोहचले. मी पुरवठा कार्यालयात जावून पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांची भेट घेतली असता. त्यावेळी आमच्यात ज्वारीचे विक्रीच्या कामा संबधाने बोलणी केली व त्यांना मी आपण सांगीतल्याप्रमाणे पंचविस आणलेत असे सांगीतले व कोणाकडे पैसे दयायचे बाबत बोलणी केली असता त्यांनी
शा-याने माझ्या बाजुला उभे असलेले खाजगी इसम श्री.देवानंद खंडाळे यांना भेटण्याचा
शारा केला. त्यानंतर खाजगी इसम श्री.खंडाळे यांनी मला त्यांचे कार्यालयातुन सोबत घेवुन बाहेर आले असता मी त्यांना लाच रक्कम घेणेबाबत सांगीतले असता खंडाळे मला म्हणाले की, हाव न मग तिकड घेतो न. चाल तू जातो तिकड सोबत येतो गाडी कुठय तुही. असे म्हणून मला खंडाळे यांनी त्यांचे गाडी मागे गाडी घेवून येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी त्यांच्या मागे मागे बुलढाणा शहरातील धाड रोड वरून मुठठे ले आऊट परिसरापर्यत मागे जावून रस्त्यावर मोटार सायकल उभी केली तेव्हा आमचे मागो-माग सापळा पथकातील पोउपअधि श्री.चोरमले साहेब व सदस्य असे खाजगी वाहनाने आले आमचे आजुबाजुने त्यांचे आस्तीत्व लपवुन थांबुन राहीले. तेव्हा श्री.खंडाळे हे मला म्हणाले की, पेमेंट सगळयायच एकखटटे पडन असे म्हणून माझेकडील 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन काढुन देण्यास सांगीतले असता मी माझे पॅन्टचे उजव्या बाजुचे खिशातील लाच रक्कम काढून खाजगी ईसम श्री. खंडाळे यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन मला विचारले किती ये आता, मी त्यावर म्हणाले की, पंचविस न, त्यावर खंडाळे म्हणाले की, पंचविस नाही हे, हे कमी आहे असे म्हणाले त्यावर मी त्यांना म्हणाले की, पंचविस ये नं पाहा न मोजून आ पंचविस भरते असे म्हणाल्यावर खंडाळे म्हणाले की, पंचविस नाही न ते असे म्हणाले त्यावेळी मी ठरल्याप्रमाणे माझे गळयातील पांढरा रूमाल काढून हातात धरून आमचे मागो माग असलेल्या सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला असता पोलीस उपअधिक्षक श्री.

चोरमले साहेब, व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी खाजगी ईसम श्री.खंडाळे यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव देवानंद बळीराम खंडाळे, वय 62 वर्ष सेवानिवृत्त जिल्हा लेखा पर्यवेक्षक रा.तानाजी नगर, बुलढाणा असे सांगीतले. त्याच वेळी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय जवळ असलेले दुसरे सापळा पथकामधील पोलीस निरीक्षक श्री.पवार व पथक यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टेकाळे यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.गजानन नंदकिशोर टेकाळे, पद-सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा पदभार जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा, वर्ग-2 असे सांगीतले त्यावेळी कारवाई पथकाने लोकसेवक श्री.गजानन टेकाळे व खाजगी ईसम श्री.देवानंद खंडाळे यांना ताब्यात घेवून झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा केलेला आहे.

आलोसे प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.गजानन टेकाळे व खाजगी ईसम श्री.देवानंद खंडाळे यांनी दिनांक 21.07.2025 रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान मला भविष्यात ज्वारी विक्री करिता सहकार्य करण्यासाठी व ज्वारीचे बिल निघण्यास कोणतीही अडचण येऊ न देण्यासाठी 70,000/-रू. लाचेची मागणी करुन दिनांक 22.07.2025 रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.टेकाळे यांनी तडजोडअंती 50000/- रुपये लाचेची मागणी करुन आरोपी श्री.देवानंद खंडाळे यांनी मला श्री.टेकाळे यांना लाच देण्यासाठी प्रोत्साहन देवुन लोकसेवक श्री.टेकाळे यांचेकरीता लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेल्या 50000/- रुपये लाच रकमेपैकी पहीला हप्ता 25,000/- रुपये स्विकारण्यास संमती दिली. त्यावरुन दिनांक 23.07.2025 रोजी 13.18 ते 13.50 वा. दरम्यान जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, बुलढाणा व मुठठे ले आऊट बुलढाणा येथे आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र.2) खाजगी ईसम श्री.देवानंद बळीराम खंडाळे, वय 62 वर्ष, सेवानिवृत्त जिल्हा लेखा पर्यवेक्षक रा.तानाजी नगर,बुलढाणा ता.जि.बुलढाणा यांनी लोकसेवक श्री.गजानन नंदकिशोर टेकाळे, पद- सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,बुलढाणा, पदभार जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांचेकरीता माझेकडून लाचेचा पहिला हप्ता 25,000/- रुपये गैरमार्गाने स्विकारुन आर्थिक गैरलाभ करुन घेतला म्हणून त्यांचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

मी दिलेली फिर्याद संगणकावर नापोकॉ. जगदीश पवार यांनी टंकलिखित केली संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेल्या फिर्यादीच प्रिंट काढून ती मी वाचून पाहीली माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

Jaysing Padmsing Rajput

**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**
समाधान [illegible]

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Ravi Uday Rathod
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)